## APPENDIX – II



### नोटीस.

खालीं लिहिल्याप्रमाणें कोल्हापूर, स्टेट इंजिनीयर खात्याकडे लागणारें सामान पुरविण्याबद्दल कंत्राक्ट द्यावयाचें आहे. तें घेण्याची ज्याची खुषी असेल त्याणें आपले सहीचें प्रत्येक सामानाबद्दल वेगवेगळें मोहरबंद टेंडर तारीख १९ मार्च सन १९०० इसवी रोजीं आमचे आफिसांत पाठवून, त्याची दुसरी प्रत श्रीमन्महाराज छत्रपति साहेब सरकार करवीर यांचे हुजूर आफिसांत त्याच दिवशी पोंचेल अशी पाठवावी.—

| टेंडराचा तपशील. | डिपाझिट रकम. | मुदत. |
|---|---|---|
| १. सुरंगीदारू, डांबरबत्ती वगैरे सामानाबद्दल.... | १० | तारीख ३१ मार्च सन १९०१ पर्यंत एक साल दर्त्तेनें. |
| २. कुंभारी सामान मातीचें .... | ....१५० | ,, |
| ३. जळाऊ लाकूड .... .... | ....३०० | ,, |
| ४. कुंभारी सामान लोखंडी .... | .... ७५ | ,, |
| ५. चुन्याचें पीठ, चुन्याची कळी व कोळसे .... | ५० | ,, |
| ६. अमेरिकन राकेलतेल हत्तीछापाचें | ....१०० | ,, |
| ७. पन्हाळा डिस्ट्रिक्टकडील बुरुडी सामान.... | टेंडरचे रकमेस शेंकडा ५ रुपये प्रमाणें होणारी रकम. | ,, |
| ८. सागवानी लाकूड, रायवळी लाकूड, कारव्या, तुराट्या, चिवे वगैरे सामानाबद्दल. | ,, | ,, |
| ९. कोल्हापूर येथील बुरडी सामानाबद्दल .... | ,, | तारीख ३१ मार्च सन १९०० पासून तारीख ३१ मार्च १९०३ पर्यंत तीन वर्षे. |
| १०. चिल्लर सामानाबद्दल .... .... | ,, | टेंडर मंजूर झालेपासून तारीख ३१ मार्च १९०३ पर्यंत ३ सालाबद्दल |

टेंडर देणाऱ्यानें पाकिटावर अमुक कामाबद्दलचें टेंडर असें लिहून आपली सही करावी. हीं टेंडरें तारीख २० माहे मार्च सन १९०० इसवी रोजीं उघडण्यांत येतील.

सदर कामासंबंधी आणखी कांहीं माहिती व शर्ती आम्हांस कळविण्याच्या असून त्याबद्दल एक कागद तयार केलेला आहे, तो टेंडर देण्यापूर्वी आमचे आफिसांत सुटीचे दिवस खेरीज करून आफीसचे वेळीं आले असतां दाखविला जाईल. त्यावरून टेंडर देणाऱ्यानें समज घेतल्याबद्दल सही केली पाहिजे. माहिती न घेतां टेंडर दिल्यास तें मंजूर केलें जाणार नाहीं.

प्रत्येक टेंडर देणाऱ्यानें वर लिहिल्याप्रमाणें डिपाझिटची रकम टेंडरासोबत रोख आमचे आफिसांत ठेविली पाहिजे. तशी डिपाझिट ज्याजकडून टेंडराबरोबर येणार नाहीं, त्याचें टेंडर घेतलें जाणार नाहीं. डिपाझिटची रकम टेंडर मंजूर झाल्यावर कंत्राटदार काम करण्यास नाकबूल झाल्यास खास जमा केली जाईल.

सर्वांत कमी दराचें अगर अमुकच टेंडर मंजूर केलें जाईल, अशाविषयीं सरकार बांधलें जाणार नाहीं, व टेंडर नामंजूर केल्याचें कारणही सांगितलें जाणार नाहीं.

D. A. VICHARE,
एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, कोल्हापूर स्टेट.

तारीख २८ फेब्रुआरी १९००.

PRINTED AT THE STATE PRESS, KOLHAPUR.